SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX 0231-260900, 2609185 थेट : 2609113, 2609302
FAX : 0091-0231-2690655,2691533 o 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in
E-mail : convocation@unishivaji.ac.in

Estd: 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र. दिनांक - 1 FEB 2020

No 0048

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः- विद्यापीठ संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालयांमार्फत स्नातकांच्या पदवीप्रमाणपत्रे वितरण व्यवस्थेबाबत...**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात गुरुवार दि.६ फेब्रुवारी,२०२० रोजी सकाळी १०.४५ वाजता संपन्न होणार आहे. या समारंभासाठी श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या एकरुप परिनियम तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार ५५ व्या दीक्षांत समारंभापासून विद्यापीठ दीक्षांत समारंभ पार पडलेपासून ३० दिवसाचे आत महाविद्यालयस्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ (Graduation Day) आयोजित करणे बंधनकारक आहे. हे आपणास विदीत आहेच. यासंदर्भातील नियमावली विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **(www.unishivaji.ac.in/56convocation)** या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी ५६ व्या दीक्षांत समारंभासाठी अर्ज भरताना **Through College** असा विकल्प निवडला आहे त्यांची पदवीप्रमाणपत्रे विद्यापीठ दीक्षांत समारंभादिवशी गुरूवार दि.६ फेब्रुवारी,२०२० रोजी **दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** या ठिकाणी सकाळी ८:०० ते १०:०० आणि दुपारी १:०० ते ५:०० या वेळेत वितरीत केली जाणार आहेत. **(अधिकच्या माहितीसाठी दूरशिक्षण केंद्राकडील ०२३१-२६९३७७१ या हेल्पलाईन दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.)**

तरी सदर पदवी प्रमाणपत्रे स्विकारण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य अथवा जबाबदार प्रशासकीय अधिका-यास अधिकार पत्रासह पाठवावे जेणेकरुन संबंधितांकडे उपरोक्तप्रमाणे अर्ज केलेल्या स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे हस्तांतरीत करण्यात येतील. महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांची संख्या, नावे विद्यापीठ संकेतस्थळावर **Convocation** सदरात प्रसिध्द करण्यात आली आहेत.महाविद्यालयांमार्फत पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्यास येणा-या प्राचार्य/प्रशासकीय सेवक/ प्रतिनिधी यांचे सोबत महाविद्यालयाच्या ओळखपत्राची साक्षांकित प्रत व अधिकार पत्र असणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत :- समितीप्रमुख, पदवी प्रमाणपत्रे वितरण समिती, दूरशिक्षण केंद्र